Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- IX ISSUE- XI NOVEMBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# जोसेफ ओपनहायमर आणि नाझी ज्यू विरोधी सिनेमातंत्राचे परीक्षण

**डॉ. रुपाली मोकाशी**
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग प्रमुख
आर के तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर

**गोषवारा:**

*१९३४ साली ॲडोल्फ हिटलर सत्तेत आल्यानंतर जोसेफ गोबेल्सला प्रबोधन आणि प्रचार मंत्रालयचा कारभार देण्यात आला. ज्यूविरोधी गोबेल्स नीतीचा एक भाग म्हणून नाझी जर्मनीच्या काळात चित्रपटांचा प्रभावी वापर केला गेला. जोसेफ ओपनहायमर (Joseph Süß Oppenheimer १६९८ - ४ फेब्रुवारी १७३८) या अठराव्या शतकातील एका जर्मन ज्यूचा वापर नाझी विरोधी द्वेष पसरवण्यासाठी केला गेला.*

***मुख्य शब्द:*** *जोसेफ ओपनहायमर, नाझी, ज्यूविरोधी सिनेमातंत्र*

हिटलर आणि गोबेल्सचा असा विश्वास होता की चित्रपट हे जनमत घडवण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. नाझींनी १९३० मध्ये प्रथम चित्रपट विभागाची स्थापना केली आणि गोबेल्सने नाझी तत्वज्ञानाचा प्रचार करण्याच्या उद्दिष्टाने चित्रपटाच्या वापरामध्ये वैयक्तिक रस घेतला होता. जर्मनीमध्ये नाझी सत्ता प्रस्थापित झाल्यावर गोबेल्सने आपल्या भाषणांमधून आग्रहाचे मत मांडायला सुरुवात केली की की जर्मन सिनेमाची भूमिका "नाझी सैन्याचा अग्रणी " अशी आहे. १९३३-३४ च्या दरम्यान अमेरिका आणि ग्रेट ब्रिटनमध्ये ज्यू सुस, द हाऊस ऑफ रॉथस्चाइल्ड आणि द वंडरिंग ज्यू अशा तीन चित्रपटांमध्ये त्यांचा इतिहास, त्यांचा होणारा अथक छळ, बळी ज्यू आणि परिणामी करावे लागणारे स्थलांतर यांचे वर्णन होते.

गोबेल्सने हेतुपुरस्सर ज्यू द्वेष निर्माण होईल अशा रीतीने या चित्रपटांची पुनर्बांधणी केली. १९३७ मध्ये, नाझी प्रचार मंत्रालयाच्या एका विशेष शाखेने म्युनिकमध्ये Der Ewige Jude (द इटरनल ज्यू) नावाचे कला प्रदर्शन भरवले. यानंतर त्याच शीर्षकाचे पुस्तक प्रकाशित झाले, ज्यामध्ये २६५ छायाचित्रे होती. प्रत्येकाला ज्यू वंशाच्या अध:पतनाचे प्रतिपादन करणारा अपमानास्पद मथळा आहे. यातील प्रत्येक चित्राला ज्यू वंशाबाबत अपमानकारक असे मथळे दिले होते. नोव्हेंबर १९३८ मध्ये, गोबेल्सने जर्मन माध्यमांमध्ये ज्यूंवर अनेक हल्ले केले. परिणामी 'क्रिस्टलनाख्त' हा ज्युविरोधी हिंसाचार सुरु झाला. यालाच नोव्हेंबर पोग्रोम असेही म्हणतात. गोबेल्सने जर्मन लोकांपर्यंत नाझींच्या विरोधी विचारांचा प्रचार करण्यासाठी एक मोहीम सुरू केली. त्याने प्रत्येक फिल्म स्टुडिओला सेमेटिक फिल्म बनवण्याचा आदेश दिला.

जर्मनीतील शहरातील हाऊस डेर गेशीस्ट अर्थात हिस्ट्री म्युझियम. **जुलै** 2008 मध्ये माझ्या स्टुटगार्ट भेटीदरम्यान अतिशय भव्य प्रशस्त दालने असलेल्या या म्युझियमला भेट दिली. याच दरम्यान तेथे नाझी कालखंडातील प्रचारकी चित्रपटांचे (propaganda films) प्रदर्शन भरवण्यात आले होते. नाझी युगात प्रचारमंत्री गोबेल्सच्या सूचनेवरून ज्यू विरोधी तीन चित्रपटांची निर्मिती करण्यात आली. Der Ewige Jude

(The Eternal Jew), Die Rothschilds (The Rothschilds) Jud Süß (Sweet Jew). यातील Jud Süß हा चित्रपट त्या काळातील सर्वाधिक लोकप्रिय चित्रपट ठरला होता. म्युझियममध्ये अनेक दालनातून उत्तम वातावरण निर्मिती करुन Sweet Jew चित्रपटाच्या पोस्टर, कलाकारांचे फोटो, कॅमेरा आणि इतर तांत्रिक साहित्य यांची खूप प्रभावी मांडणी केली होती. या प्रदर्शनातून जोसेफ ओपनहायमरची कहाणी उलगडत गेली.

**स्टुटगार्ट १६९८- ते १७३८:**

१६९८ मध्ये हायडेलबर्ग शहरात जोसेफ चा जन्म झाला. त्याच्या भावाने आणि बहिणीने ख्रिस्ती धर्म स्वीकारून टाउफेनबर्गर हे आडनाव स्वीकारले होते. डार्मस्टाटच्या दरबारात त्यांना खाजगी सचिवाची नोकरी निवांतपणे करता आली. जोसेफच्या आयुष्याने मात्र अनेक चढ-उतार पाहिले. लहानपणापासूनच जोसेफने शाळेतील शिक्षणाकडे फारसा रस दाखवला नाही. मात्र उपजतच व्यापारासाठी राहणारी चलाखी त्याच्याकडे होती. थोड्याच अवधीत ओपनहायमरचा व्यापार दूरवर पसरला. मॅनहाइम आणि फ्रँकफर्ट येथे त्याला दोन शाखा उघडाव्या लागल्या. १७३२ मध्ये जोसेफ ची भेट वुर्टेमबर्गचा राजपुत्र कार्ल अलेक्झांडर यांच्याशी झाली. त्याच्या आयुष्याला कलाटणी देणारी ही घटना होती.

पूर्वी जर्मनी हा राजकीयदृष्ट्या एकसंध देश नव्हता. तेथे भारताप्रमाणे लहान-मोठी अनेक स्वतंत्र राष्ट्रे होती. जर्मनीच्या दक्षिणेला असलेल्या वुर्टेमबर्ग राज्याची स्टुटगार्ट ही राजधानी होती. १७३३ डिसेंबर महिन्यात कार्ल राजा झाला. मात्र त्याच्या राजकीय विरोधकांच्या कारवायांमुळे कार्ल अगदी निष्प्रभ झाला होता. विशेषता आर्थिक बाजूने त्याची कोंडी झाली होती. ९ जानेवारी १७३४ रोजी आपल्या प्रमुख सल्लागार म्हणून त्याने ओपनहायमरची नेमणूक केली. थोड्याच अवधीत जोसेफ कार्लला घसघशीत आर्थिक नफा मिळवून द्यायला सुरुवात केली. जसजसा ओपनहायमर कार्लची मर्जी संपादन करीत गेला तसतसा दरबारी मंडळींच्या डोळ्यात तो सलू लागला. त्याचे ज्यू असणे हे त्यातील एक खूप महत्त्वाचे कारण होते. टाकशाळेमध्ये निकृष्ट दर्जाची नाणी पाडून ओपनहायमरने स्वतःसाठी आणि राजासाठी बराच पैसा कमावला, असा या दरबारी लोकांचा आक्षेप होता. परंतु कार्लने ओपनहायमर निर्दोष असल्याचे जाहीर केले. कार्लची आर्थिक चणचण, त्याचे लष्करी महत्वाकांक्षी इरादे यामुळे त्याला सतत ओपनहायमरची गरज भासत गेली. आपल्यावरील राजमर्जी ओळखून ओपनहायमरने अनेक ज्यू कुटुंबांना वुर्टेमबर्ग प्रांतात स्थलांतरित केले. राजाने देखील ज्यूंना राज्यात रहाण्याची परवानगी नसताना ओपनहायमरच्या या कृत्यांकडे दुर्लक्ष केले. या सर्वांवर कळस म्हणजे १७३६ मध्ये राज्यातील विविध अधिकाऱ्यांच्या वर्तनावर लक्ष ठेवणे , त्यांनी काही बेकायदेशीर वर्तन केले तर त्याची तपासणी करणे आणि नवीन अधिकाऱ्यांची अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणे अशा कामांसाठी एक विशेष मंडळ नेमले आणि ओपनहायमरची या मंडळाचा प्रमुख म्हणून नेमणूक केली. वुर्टेमबर्ग राज्यातील हे मंडळ म्हणजे भ्रष्टाचाराचे एक आगार बनले.

या सगळ्या व्यवहारांमध्ये ओपनहायमरने केलेल्या व न केलेल्या देखील भ्रष्टाचाराचे माप त्याच्याच पदरात पडू लागले. वुर्टेमबर्ग मधील सरदार , अधिकारी एकूण काय साऱ्यांच्याच नजरेत ओपनहायमर हा खलनायक बनला. असा एक खलनायक ज्याने राजाला आपले बाहुले बनवून ठेवले होते. आता राज्यातून प्रवास करण्यासाठी किंवा स्टुटगार्ट मध्ये राहण्यासाठी ज्यूंना काही ठराविक कर भरला आणि जोसेफला तसे सूचित केले की पुरेसे होते. परंपरागत ख्रिस्ती जर्मन अधिकाऱ्यांना आणि चर्चला ही गोष्ट केवळ अशक्य होती. त्यातच ओपनहायमरने जर्मन जनतेवर विविध प्रकारचे कर लादून कार्लच्या तुंबड्या भरण्याचे काम चालूच ठेवले होते.

स्टुटगार्टच्या जनतेने पुन्हा एकदा कार्ल समोर तक्रार करणारे निवेदन सादर केले. १२ फेब्रुवारी १७३७ रोजी राजाने फर्मान काढून असल्याचे पुन्हा एकदा ओपनहायमर निर्दोष असल्याचे जाहीर केले आहे. 'जोसेफ निर्दोष आहे मात्र काही दुष्ट प्रवृत्ती हे लोक त्याच्यावर विनाकारण कलंक लावून पहात आहेत जोसेप ओपनहायमर हा फक्त राजाचा नव्हे तर राज्याचे हित लक्षात ठेवून काम करीत आहे' असे भाष्य त्याने केले.

पण जोसेफ चतुर व्यापारी होता. राजा जरी आंधळेपणाने त्याच्यावर विसंबून असला तरीही वुर्टेमबर्गमधील जनक्षोभ न जाण्याइतका तो निश्चितच दुधखुळा नव्हता. त्याने तातडीने राजाला सारे हिशोब सादर केले व वुर्टेमबर्ग सोडून जाण्यासाठी कार्लची परवानगी घ्यायला निघाला. पण यावेळेस नशिबाचे फासे उलटे पडले. कार्लने ओपनहायमरचा राजीनामा मंजूर केला व त्याला शेवटचा शाही खाना देण्यास बोलवले. हा दिवस होता ११ मार्च १७३७. आणि रात्री अचानक काल मृत्यू झाला.

या सगळ्या हालचाली अतिशय झपाट्याने झाल्या. त्याच्या मृत्यूची बातमी राणीला कळविण्यासाठी ओपनहायमरला कर्नल रॉडर बरोबर पाठवले. त्याच रात्री स्टुटगार्टमधील सर्व ज्यूंना अटक झाली. ओपनहायमरने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याला देखील अटक झाली. ओपनहायमरवर खटला भरला गेला.

२५ जानेवारी १७३८ रोजी राजपुत्र रुडोल्फ जोसेफ ओपनहायमरला देहांताची शिक्षा सुनावली. ओपनहायमरला स्टुटगार्ट आणले. त्याला ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यास माफी देण्यात येईल अशी एक शेवटची संधी देण्यात आली. पण जोसेफने धर्मांतराच्या बदल्यात जीव वाचविण्यास साफ नकार दिला. जोसेफ म्हणतो, 'I will die as a Jew, I am suffering violence and injustice.'

3 फेब्रुवारी रोजी स्टुटगार्ट मध्ये त्याला फाशीची तयारी झाली. पुन्हा एकदा जोसेफला धर्मांतर केल्यास फाशी माफ होईल असे आमिष देण्यात आले. पण स्टुटगार्टच्या हजारो लोकांच्या जमावाच्या समोर ओपनहायमर फाशीला सामोरा गेला. जोसेफची कथा त्याच्या मृत्युनंतर देखील संपत नाही तर नाटकातील अंका प्रमाणे केवळ त्याच्या जीवित आयुष्यावर पडदा पडतो. त्याला दिलेली फाशीची शिक्षा देखील Gibbet या प्रकारची होती. म्हणजे एका मोठ्या पिंजऱ्यात जोसेफला फाशी देऊन त्याचा मृतदेह त्याच पिंजऱ्यात अनेक दिवस स्टुटगार्टमध्ये टांगून ठेवला होता.

**नाझी युगातील जर्मनी**:

इसवी सन चौथ्या शतकापासून जर्मनी ज्यूंचे वास्तव्य होते. येणाऱ्या काळात कमी अधिक प्रमाणात त्यांना विविध निर्बंधांना सामोरे जावे लागत होते. मात्र १९३३ नंतर नाझी राजवटीत त्यांच्यावर जणू काळाने घाला घातला. नाझी राजवटीने पहिल्या महायुद्धातील पराभवाबद्दल बऱ्याच अंशी ज्यूंना दोषी मानले. सप्टेंबर १९३५ मध्ये नोव्हेंबर कायदा पास केला व जर्मनीतील ज्यूंचे नागरिकत्वाचे हक्क काढून घेतले गेले. या पुढचे पाऊल म्हणजे ज्यू वंशाचा पद्धतशीरपणे संहार करणे. याकरिता जर्मनी आणि पूर्व युरोपात अनेक ठिकाणी छळ छावण्या उभारण्यात आल्या. ते नरसंहाराचे कारखाने होते. आता आपल्याला असा प्रश्न पडला असेल की हा तर सर्वतोपरी ज्ञात इतिहास झाला त्यात नवीन असे सांगण्यासारखे काय आहे?

**चित्रपट Jud Süß – एक आयुष्य आणि दोन मृत्यू :**

जर्मन जनमानसात ज्यूंबद्दल अतिव द्वेष निर्माण करण्यासाठी आणि समाजात ज्यूंची एक नफेखोर घातकी आणि हेटाळणी योग्य प्रतिमा निर्माण करण्यासाठी अडोल्फ हिटलरची सारी मदार गोबेल्स या आपल्या प्रचार मंत्र्यावर होती. गोबेल्सने अतिशय धूर्तपणे मीडियाला यावेळेस वेठीस धरले. १९३९ च्या


सुमारास हिटलर सोविएत रशिया बरोबर आक्रमणाचा करार करण्यात गुंतला असताना गोबेल्सने पद्धतशीरपणे प्रतिमाहनना साठी चित्रपटांची निर्मिती हाती घेतली. यातील जे तीन चित्रपट त्याकाळी अतिशय प्रसिद्ध झाले होते त्यातील Jud Süß (Sweet Jew) हा सर्वाधिक लोकप्रिय ठरला. नाझी तंत्रानुसार जर्मन समाजात ज्यूंबद्दल द्वेष पसरवण्यासाठी करण्यासाठी ओपनहायमर पुन्हा एकदा जगावे लागले. ओपनहायमरच्या जीवनावर १९२५ म्युनिक मधील लेऑन फुक्तवागनर याने कादंबरी लिहिली होती. त्याची वीस भाषांमध्ये भाषांतरे देखील झाली होती. १९२९ मध्ये अशले ड्युक याने त्यावर एक नाटक बसवले होते. या कलाकृतींमध्ये दडलेला विकार गोबेल्सच्या नजरेने अचूक वेधला. ओपनहायमरची कहाणी एक शोकांतिका नव्हे तर ज्यूंबद्दल पद्धतशीरपणे द्वेष पसरवण्याचे साधन म्हणून पुन्हा लिहिली गेली.

१९३० पासून गोबेल्सने पध्दतशीरपणे प्रसारमाध्यमांना वेठीस धरले होते. लवकरच जर्मन चित्रपट उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केले गेले. राजकीयदृष्ट्या दृष्ट्या नव्हे तर नाझी दृष्ट्या 'योग्य' चित्रपटांची निर्मिती व्हावी यासाठी डॉईश फिल्म अकॅडेमी ची स्थापना केली गेली. एवढेच नाही तर चित्रपट उद्योगातील प्रत्येक कलाकार दिग्दर्शक आणि तंत्रज्ञ यांना या संस्थेचे सदस्यत्व घेणे सक्तीचे केले गेले.

गोबेल्सच्या कडव्या निगराणीखाली व्हाइट फेरलान याने चित्रपटाचे लेखन-दिग्दर्शन याची जबाबदारी स्वीकारली. जर्मन लोकांच्या ज्यू विरोधी ब्रेनवॉशिंग करता ओपनहायमर पुन्हा जन्माला घातला गेला. दिग्दर्शक फेरलान आपल्या आठवणीत एके ठिकाणी म्हणतो सिनेगॉग मधील मॉबसीन करता वांशिक दृष्ट्या अचूक दिसणारे ज्यू मुद्दाम घेट्टो मधून आणले गेले होते. पटकथा लिहिताना मात्र मुद्दामच भडक रंगविले गेले. ओपनहायमर आता एक व्यक्ती उरला नव्हता. तो नाझी पद्धतीप्रमाणे ज्यूंचे एक प्रातिनिधिक स्वरूप बनवला गेला. हा चित्रपट पाहताना प्रेक्षकांच्या मनाचे व्यवस्थित ब्रेनवॉशिंग होईल याची काळजी घेतली गेली. गोबेल्सच्या सूचनेवरून चित्रपटाच्या पटकथेत काही असे प्रसंग घातले जेणेकरून ओपनहायमर च्या पात्राला अधिकाधिक निगेटिव्ह छटा दिल्या. डोरेथा हिचे पात्र कथेत आणले. ती ओपनहायमर याला विरोध करणाऱ्या गटातील स्ट्रम यांची मुलगी होती. ओपनहायमरची नजर डोरेथावर होती. पण स्ट्रमने तिचे लग्न फेबर याच्याशी केले. दरम्यान ओपनहायमर विरुद्ध या गटाने गुप्तपणे उठावाची योजना आखली. पण ओपनहायमरचे पारडे या काळात अंमळ जड होते. त्याने स्ट्रम ला अटक केली. स्ट्रमच्या सुटकेसाठी डोरेथा ओपनहायमरच्या स्वाधीन होते व स्ट्रमची सुटका होते. मात्र दुसऱ्या दिवशी डोरेथाचे शव नेकर नदीच्या पात्रात सापडते. ओपनहायमरबद्दल चीड आणण्याकरिता या कथानकाने चोख काम केले. **Jud Süß** हा चित्रपट नाझी नेत्यांनी आपली विचारसरणी कार्यकर्त्यांच्या ठसवण्यासाठी पुरेपूर वापरला. १९४० मध्ये हाईनरिश हिमलर याने सर्व एस एस गार्डस आणि पोलिसांना हा चित्रपट पाहणे सक्तीचे केले. विशेषतः पूर्व यूरोपातील छळ छावण्यांवर पहारेकरी म्हणून पाठवण्यात येणाऱ्या अधिकारी व पोलिसांना हा चित्रपट पाहूनच पाठवले जात असे. अशा रीतीने यैर मिन्त्झकर म्हणतो त्याप्रमाणे ओपनहायमर याला अनेक मृत्यूंना सामोरे जावे लागले.



जोसेफ ओपनहायमर याचे चित्र




Jud Süß चित्रपटाचे पोस्टर

**संदर्भ:**

1. Leiser Erwin, Nazi Cinema, MacMillan Publishing Company, 1975
2. Gary Jason, Film and Propaganda: The Lessons of the Nazi Film Industry, Reason Papers Vol. 35, no. 1
3. Mintzker Yair, The Many Deaths of Jew Süss : The Notorious Trial and Execution of an Eighteenth-Century Court Jew. Princeton: Princeton University Press, 2017

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com